## पावसाळा कालावधीत विविध प्राधिकरणांच्या सर्व यंत्रणांनी सतर्क रहावे :सौरभ राव


# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष-४

अंक - ४१

epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार,१२ मे २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


ठाणे : मान्सूनच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात विविध प्राधिकरणामार्फत तसेच ठाणे महापालिकेच्यावतीने सुरू असलेली सर्व विकासकामे ही येत्या २० मे पर्यंत पूर्ण करावीत. घोडबंदर रोडवर सुरू असलेल्या कामांवर महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवून सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण होतील या दृष्टीने संबंधित प्राधिकरणांशी समन्वय साधावा...(पान ६ वर)



# डम्पिंग ग्राउंड वरुन दिवावासियांची फसवणूक होतेय का?

## ठाकरेंच्या शिवसेनेच्या ज्योती पाटील यांनी पालिकेला दिलेल्या पत्रामुळे डम्पिंग प्रश्नावर पुन्हा राजकारण पेटणार

दिवा:-दिव्यात छुप्या पद्धतीने सुरू असलेले डंपिंग बंद करण्यात यावे अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांना पत्र देऊन केली आहे.छुप्या पध्दतीने डंम्पिंग ग्राऊंड सुरु असल्याचा आरोप ज्योती पाटील यांनी केल्यानंतर आता या विषयावर राजकारण पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.दिव्यातील डम्पिंग ग्राउंड बंद केल्याचे जाहीर झाल्यानंतर आजही छुप्या पद्धतीने दिव्यात डम्पिंग ग्राउंड सुरू असल्याने ही दिवावासीयांची पालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी केलेली फसवणूक असल्याचा आरोप ज्योती पाटील यांनी या पत्रात केला आहे.

पालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रात ज्योती पाटील यांनी म्हटले आहे की,दिवा डंपिंग ग्राउंड बंद करत असल्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मात्र दिवा शहरातील डम्पिंग ग्राउंड हे मागील काही महिन्यांपासून छुप्या मार्गाने सुरू आहे. या ठिकाणी कचरा आणून टाकला जात आहे. ही दिवा वासियांची घोर फसवणूक आहे. पालिका प्रशासनाने शब्द देऊनही दिव्यातील जनतेला पुन्हा कचऱ्याच्या धुरात जीव गुदमरण्यासाठी सोडले आहे काय ? असा प्रश्न धोती पाटील यांनी या पत्राच्या माध्यमातून विचारला आहे.महापालिका प्रशासनाने एकदा हे डम्पिंग ग्राउंड बंद केल्याची घोषणा केल्यानंतर पुन्हा तेच डम्पिंग सुरू करण्याचे कसे काय ठरवले ? यामागे बोलवता धनी कोण आहे ? दिव्याला डम्पिंग ग्राउंड समजणारी मानसिकता कोणती आहे ? याची उत्तरे सर्वसामान्य दिवा वासीयांना मिळायला हवीत. दिव्यात डंपिंग ग्राउंड मुळे येथील महिला, लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. हवेची गुणवत्ता दूषित होते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे . शहरात दुर्गंधी पसरते आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून दिव्यातील डम्पिंग कायमचे बंद करण्यात यावे व छुप्या मार्गाने दिवा डंपिंग वर टाकण्यात येणारा कचरा तात्काळ रोखावा अशी अशी मागणी ज्योती पाटील यांनी या पत्राद्वारे पालिका आयुक्तांकडे केली आहे. आपण हे न केल्यास ठाणे महानगरपालिकेने व सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी दिव्यातील जनतेची फसवणूक केली असे आम्हाला खेदाने म्हणावे लागेल असेही ज्योती पाटील यांनी या पत्राच्या शेवटी म्हटले आहे.



# सोशल मीडिया आणि ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी केंद्र शासन कठोर कायदा करणार

**खासदार नरेश म्हस्के यांच्या मागणीला केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचे लेखी उत्तर**

**ठाणे** :- बिभित्स, अश्लील आणि हिंसक कंटेंट प्रसारित करण्ऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया, ओटीटी प्लॅफॉर्म संदर्भात नियम ३७७ अंतर्गत खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेमध्ये आवाज उठवला होता. तसेच या संदर्भात भारत सरकारचे रेल्वे, माहिती व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णवजी यांना लेखी निवेदन दिल्यानंतर त्यांनी सरकार लवकरच यावर कडक कायदा आणण्याच्या तयारीत आहे असे लेखी उत्तर खासदार नरेश म्हस्के यांना दिले आहे. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचे महत्त्व नक्कीच खूप मोठे आहे. माहितीच्या देवाणघेवाणीपासून ते लोकांमध्ये संवाद वाढवण्यापर्यंत, या प्लॅटफॉर्म्सने एक वेगळीच क्रांती घडवून आणली आहे. मात्र, दुर्दैवाची गोष्ट अशी की, या स्वातंत्र्याचा आणि संधीचा काही

### खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत उठवला होता आवाज

मंडळी अक्षरशः गैरवापर करत आहेत असे खासदार नरेश म्हस्के यांनी निदर्शनास आणून दिले होते. एजाज खान यासारखे अनेक कंटेंट क्रिएटर्स, सोशल मीडियावर 'कॉन्टेन्ट'च्या नावाखाली अश्लीलता पसरवत आहेत. भाषेचा स्तर घसरवणं, अंगविक्षेप, समाजात विकृती वाढवणारे संवाद, हिंसक वर्तन हे सर्व दिवसेंदिवस सामान्य होत चाललं आहे. तरुणाईला आकर्षित करण्याच्या नावाखाली अश्लीलतेचा कळस गाठणारे हे व्हिडिओज आणि पोस्ट्स पाहून भारतीय संस्कृतीला लज्जा वाटावी अशी परिस्थिती निर्माण होत आहे खासदार नरेश म्हस्के यांनी म्हटले होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर, खासदार नरेश म्हस्के यांनी नियम ३७७ अंतर्गत संसदेमध्ये आवाज उठवला होता. या नियमाअंतर्गत अशा सर्व डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर नियंत्रण आणण्याची, सेन्सॉर प्रणाली लागू करण्याची आणि अश्लीलतेचा प्रसार करणाऱ्या कंटेंटवर बंदी आणण्याची मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी केली होती.

भारत सरकारचे रेल्वे, माहिती व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णवजी यांनी खासदार नरेश म्हस्के यांच्या मागणीची गंभीर दखल घेतली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार नरेश म्हस्के यांना लेखी पत्राद्वारे उत्तर दिले असून, सरकार लवकरच यावर कडक कायदा आणण्याच्या तयारीत आहे असे म्हटले आहे. यासाठी वैष्णवजी यांचे खासदार नरेश म्हस्के यांनी जाहीर आभार मानले आहेत.

# प्रदुषण करणाऱ्या वाहनांना इंधन बंदी..

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई**:- तांत्रिकदृष्ट्या सदोष वाहन चालवून प्रदूषण करण्ऱ्या वाहनधारकांना यापुढे पेट्रोल पंपावर इंधन बंदी करण्यात विचार असुन, लवकरच अशा प्रकारचे धोरण आणण्यात येईल असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. ते मंत्रालयात आपल्या दालनात घेतलेल्या मोटार परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये बोलत होते. या बैठकीला परिवहन विभागाचे सहसचिव किरण होळकर, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार व इतर अधिकारी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, दिवसेंदिवस रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढत चालली आहे. पारंपारिक इंधनावर चालण्ऱ्या वाहनांमुळे वायु प्रदूषण वेगाने होते. त्यासाठी राज्य शासनाने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र प्रत्येक वाहनाला लागू केले आहे. तथापि, ही प्रमाणपत्रे वाहनधारक चुकीच्या पद्धतीने प्राप्त करून घेतात किंवा सदर प्रमाणपत्र बोगस असल्याच्या देखील तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सदोष असलेली वाहने रस्त्यावर आल्याने वायु प्रदूषणा मध्ये वाढ होत आहे. वाढत्या वायू प्रदूषणामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक वेगाने घसरत चालला आहे. त्याला ब्र्याच अंशी तांत्रिक दृष्ट्या सदोष वाहने जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यामुळे भविष्यात क्विक रिस्पॉन्स कोडआधारित प्रदूषण नियंत्रण पत्र देण्यात येणारा असून, प्रत्येक पेट्रोल पंपावर इंधन भरायला येण्ऱ्या वाहनाची हवा गुणोत्तर निर्देशकां नुसार तपासणी केली जाईल. ज्यांच्याकडे वैद्य प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असेल त्यांनाच इंधन दिले जाईल. अशा प्रकारचे कडक नियम असणारे धोरण लवकरच परिवहन विभागामार्फत आणण्यात येणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेणे आवश्यक आहे. आपल्या पिढीने भावी पिढीचा देखील विचार केला पाहिजे! त्या पिढीला शुद्ध हवा मिळावी, यासाठी आत्ताच वायु प्रदूषणावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा कडक नियमांची अंमलबजावणी करणे अपरिहार्य असल्याचे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

# ठाण्यात लवकरच हवाई टॅक्सी सुरु होणार

## मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती



**ठाणे** : ठाणे शहरात हवाई (पॉड) टॅक्सी च्या माध्यमातून भविष्यातील अत्यंत सुलभ आणि किफायतशीर वाहतूक व्यवस्था सुरु होत आहे. त्या अनुषंगाने आवश्यक असण्ऱ्या सर्व परवानगी घेणे व सर्वेक्षण करण्याची परवानगी संबंधित संस्थेला ठाणे महापालिकेने दिली आहे. त्यामुळे लवकरच हा प्रकल्प मार्गी लागेल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

ठाणे शहराची लोकसंख्या २५ लाखाच्या पुढे गेली आहे. राज्यात नागरिकांना सर्वाधिक वेग ठाणे शहरामध्ये आहे. सहाजिकच भविष्यात रस्ते वाहतूकीला अनेक मर्यादा येणार आहेत. त्यामुळे रस्ते वाहतुकीवरील कोंडी दूर करण्यासाठी हवाई (पॉड) टॅक्सी चा प्रयोग नक्कीच यशस्वी ठरेल. तसेच उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून ठाणे शहरात मेट्रो मार्गीकेचे जाळे देखील विकसित होत आहे.वडाळा ते गायमुख पुढील वर्षी सुरू होणे प्रस्तावित आहे. ठाणे शहरातील कापुरबावडी ते गायमुख परिसरात मेट्रोला कनेक्टिव्हिटी देण्याच्या दृष्टीने हवाई टॅक्सी हा एक उत्तम पर्याय पुढे आला आहे. त्यामुळे भविष्यात रस्त्यावरील वाहतुकीला पर्याय म्हणून सुलभ आणि सुरक्षित हवाई टॅक्सी ठाणे शहरात सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आणि केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली गुजरात येथील वडोदरा येथे हवाई टॅक्सी चा प्रायोगिक प्रकल्प राबवला जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे आणि मीरा-भाईंदर पालिका क्षेत्रामध्ये अशा प्रकारचा प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात मंत्री सरनाईक यांना निर्देश दिले होते. त्यानुसार त्यांनी गुजरात दौऱ्यावर या प्रकल्पाची पाहणी केली. त्या प्रकल्पाला भेट दिल्यानंतर मंत्री सरनाईक यांनी अशाच प्रकारचा प्रयोग ठाणे व मीरा -भाईंदर पालिका क्षेत्रामध्ये करण्याबाबत पुढाकार घेतला. Neutron EV mobility limited या कंपनीच्या माध्यमातून ठाणे शहरात हवाई टॅक्सीच्या संदर्भात सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी घोडबंदर रोड वरील भाईंदर पाडा येथे विहंग हिल्स परिसरातील ४० मीटर रस्त्यावर हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात यावा अशी सूचना मंत्री सरनाईक यांनी केली आहे. या प्रकल्पासाठी महापालिका अथवा शासनाचा एक रुपये खर्च होणार नाही. तसेच शहरातील भविष्यातील वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने या प्रकल्पाचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे .असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्यातील रस्त्यावरील अतिक्रमण हटवा

## शिवसेना ठाकरे गटाचे रोहिदास मुंडे यांचे पालिकेला पत्र

दिवा:- दिवा शहरातील रस्त्यावरील फेरीवाल्यांचे अतिक्रमण हटवून येथील नागरिकांना दिलासा द्या. शहरातील रस्ते फेरीवाला मुक्त न झाल्यास प्रशासनाच्या कारभाराविरोधात न्यायालयात जाण्याचा इशाराही मुंडे यांनी दिला आहे.

दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांना याबाबतचे पत्र रोहिदास मुंडे यांनी दिले आहे. या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, या फेरीवाल्यांना रस्त्यावर बसवणारे दिवा शहर बकाल करत आहेत. दिव्यात एकही रस्ता हा मोठा नाही.अशा स्थितीत आहेत ते रस्ते फेरीवाल्यांनी व्यापल्याने येथील ५ लाख जनतेने चालायचे कुठून आणि वाहन चालकांनी वाहने कुठून चालवायची. फेरीवाल्यांना ज्याने अभय दिले आहे त्यांचे आर्थिक हितसंबंध या लोकांशी आहेत.चार पैशांसाठी दिवाशहराची वाट लावण्याचे काम केले जात आहे.दिवा स्टेशन ते आगासन रस्ता,दिवा स्टेशन ते मुंब्रा देवी कॉलनी रस्ता, दिवा स्टेशन ते दिवा टर्निंग हे सर्वच रस्ते फेरीवाल्यांनी व्यापले आहेत.यामुळे वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना चालण्यासाठी देखील जागा मिळत नाही असे मुंडे यांनी या पत्रात म्हटले आहे.याबाबत सहाय्यक आयुक्त यांनी तातडीने फेरीवाल्यांवर कारवाई करून दिवा स्टेशन रोड,मुंब्रा देवी कॉलनी, दिवा आगासन रोड फेरीवाला मुक्त करावा.फेरीवाल्यांना पालिकेने फेरीवाला झोन जाहीर करून त्या ठिकाणी फेरीवाले पालिकेचे बसवावेत जेणेकरून त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण होणार नाह. नवी मुंबई ज्या पद्धतीने आतील रस्त्यांना किंवा गल्लीमध्ये फेरीवाला क्षेत्र असते किंवा एखाद्या मैदानात फेरीवाले असतात त्या पद्धतीने दिवा शहरात रचना करावी. मुख्य रस्त्यांवर असणारे फेरीवाले हटवून रस्ता नागरिकांसाठी मोकळा करावा अन्यथा या विरोधात नागरिकांच्या सहकार्याने न्यायालयात दाद मागणार असा इशारा दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी दिला आहे.

# ठाणे रेल्वे स्थानकातील विकासकामे पावसाळ्यापूर्वी युध्दपातळीवर पूर्ण करा

## युद्धजन्य परिस्थितीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी दक्ष रहा

## आरक्षण खिडक्या वाढवा, नियमित स्वच्छतेवर भर द्या

### पाहणी दौऱ्यात खासदार नरेश म्हस्के यांच्या रेल्वे अधिकाऱ्यांना सूचना



ठाणे - ठाणे रेल्वे स्थानकाचा नुतनीकरणाच्या माध्यमातून कायापालट होत आहे. फलाटांवर नव्याने छतांची उभारणी, पंखे, वाढीव आरक्षण खिडक्या, वातानुकूलीत प्रतीक्षा कक्ष उभारण्यात येत आहे. नियमित स्वच्छतेवर भर द्या, युद्धजन्य परिस्थितीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी दक्ष रहा, पावसाळ्यापूर्वी सर्व विकासकामे तातडीने पूर्ण करा, अशा महत्वपूर्ण सूचना आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना केल्या.

ठाणे रेल्वे स्थानकात सुरु असलेल्या विकासकामांचा आढवा तसेच प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा केला. या दौऱ्यानंतर बैठक घेण्यात आली. गेल्या वर्षभरापासून वेळोवेळी केलेल्या सूचनांची योग्य अमंलबजावणी रेल्वे अधिकाऱ्यांनी केली आहे. आज प्रत्यक्षात सर्व बदल दिसत असून विकासकामांबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी समाधान व्यक्त करत अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज ८ लाख प्रवासी प्रवास करत आहेत. रेल्वे प्रवाशांच्या समस्या, विकासकामे, प्रस्तावित कामांबाबत मी निवडून आल्यापासून डीआरएम, डीएम यांच्याशी सातत्याने माझा पाठपुरावा सुरु आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकाही झाल्या आहेत. आता नव्याने वातानुकूलीत प्रतिक्षा कक्ष उभारला जात असून येत्या जुलै महिन्यात त्याचे लोकर्पण अपेक्षित आहे. ८ एक्सिलेटर्स प्रवाशांच्या सेवेत असून २ एक्सिलेटर्स लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी माध्यमांना दिली.

ठाणे रेल्वे स्थानकातील फलाटांवरील नव्याने छताचे पत्रे बदलण्याचे काम वेगाने सुरु आहे. एका रेल्वे पादचारी पूलाचे काम सुरु असून लवकरच ते मार्गी लागणार आहे. उन्हाळ्याची सुट्टी पडली असून मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी जाणार असल्याने तातडीने दोन वाढीव आरक्षण खिडक्या सुरु करण्यात येणार आहेत.

स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता करणे, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे पोलीस सज्ज असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.


ठाणे आणि मुलंड रेल्वे स्थानका दरम्यान नवीन स्थानकाची उभारणी करण्यात येणार आहे. कायदेशीर अडचण आल्याने त्याचे काम खोळंबले आहे. मात्र त्यातून तोडगा लवकरच निघणार असून नवीन रेल्वे स्थानकाची उभारणी झाल्यावर ठाणे रेल्वे स्थानकावरचा मोठा ताण कमी होणार आहे. ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांची गर्दी पाहाता मोजून दोन ते तिन तास विकासकामे करायला अधिकाऱ्यांना वेळ मिळतो. अतिशय कमी वेळेत रेल्वेचे अधिकारी काम करत असल्याबद्दल यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी त्यांचे कौतुक केले.

पाहणी दौऱ्यात मध्य रेल्वेचे मंडल मुख्य अभियंता विलास पैठणकर, रेल्वे पोलीस दलाचे सहाय्यक आयुक्त अतुल क्षिरसागर, स्टेशन प्रबंधक केशव तावडे, सहाय्यक वाणिज्य प्रबंधक एम. एल. मिना, शिवसेना ठाणे शहर प्रमुख हेमंत पवार, सचिव बाळा गवस, शहर संघटक भास्कर पाटील, रमाकांत पाटील, विभागप्रमुख कमलेश चव्हाण, अमित जयस्वाल, किरण नाकती, निखिल बुजबडे, प्रशांत पाटील, संतोष बोडके, प्रकाश पायरे, संजिव कुलकर्णी, वैभव ठाकूर, आनंद जयस्वाल, रोहित गायकवाड, प्रीतम राजपूत, प्रकाश खांडेकर, विकास पाटील, सुशांत मोरे, अशोक कदम, रमाकांत चौधरी, मधुकर गिजे, महिला उपजिल्हाप्रमुख वंदना डोंगरे, विभागप्रमुख रिना मुदलीयार, यमुना म्हात्रे, प्राची मोरे आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# १ ६ हजार कोटींचा निधी मिळूनही ठाण्याचा विकास रखडला ,झालेल्या कामांची श्वेतपत्रिका काढण्याची ठाणे काँग्रेसची मागणी

ठाणे: ठाणे महापालिकेला गेल्या १५ वर्षात केंद्र आणि राज्य शासनाकडून तब्बल १६ हजार कोटींचा निधी मिळाला आहे. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मिळूनही ठाण्यातील समस्या अजूनही कायम असून ठाण्याचा विकास देखील रखडला आहे.त्यामुळे एवढा निधी खर्च झाला कसा झाला आणि कुठे झाला यासंदर्भात पालिका आयुक्तांनी श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी ठाणे काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. ठाण्यात झालेल्या विकासकामांची पोलखोल करण्यासाठी कासारवडवली ते बीकेसी एमएमआरडीए कार्यालयापर्यंत लॉन्गमार्च काढण्यात येणार असल्याची माहिती ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष

## विकासकामांची पोलखोल करण्यासाठी ठाणे ते बीकेसी काढणार लॉगमार्च...



विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन ठाणे महापालिकेला गेल्या १५ वर्षात काँग्रेस आणि भाजपच्या काळात केंद्र सरकारच्या माध्यमातून बीएसयुपी आणि स्मार्ट सिटी साठी ४ हजार कोटींचा निधी आला आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडून साडेसहा हजार कोटी तसेच पालिकेच्या अर्थसंकल्पातील निधी असा एकूण गेल्या १५ वर्षात १६ हजार कोटींचा निधी प्राप्त झाला असल्याची माहिती चव्हाण यांनी दिली. एवढा कोट्यवधीचा निधी मिळाल्यावर ठाण्याचे शांगय होणे आवश्यक होते. मात्र ठाणे शहरात घकचरा,वाहतूक कोंडी, अनाधिकृत बांधकाम, शाळांची अवस्था, ड्रेनेज, धोकादायक इमारतींसाठी क्लस्टर योजना अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहेत. एवढा निधी आला असेल तर हा निधी गेला कुठे? असा प्रश्न विक्रांत चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे प्रत्येक विभागात झालेले काम तपासले गेले पाहिजे , निविदा प्रक्रिया पासून तपासणे गरजेचे आहे, कामे कायदेशीर झाले आहेत का, कामांना विलंब का झाला आहे का , कामाचा दर्जा तपासाला गेला का यासाठी श्वेतपत्रिका काढण्याची मागणी काँग्रेसच्या माध्यमातून विक्रांत चव्हाण यांनी केली आहे. या कामाचे शासनाकडून सर्व जी आर मिळवले आहे. या सर्व कामांची पोलखोल करण्यासाठी१३ मे ला लॉन्ग मार्च काढण्यात येणार आहे. कासारवडवली पासून बीकेसी येथील एमएमआरडीए च्या कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती विक्रांत चव्हाण यांनी दिली आहे.

# कंत्राटी कामगारांची पिळवणूक थांबणार...

## राज्य शासनाकडून किमान वेतनाचा अध्यादेश जारी..

ठाणे: ठाणे महापालिकेसह राज्यभरातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कंत्राटी कामगारांची ठेकेदारांकडून होणारी पिळवणूक थांबणार असल्याची माहिती आमदार संजय केळकरांनी दिली. नुकत्याच जारी करण्यात आलेल्या अध्यादेशानुसार या कामगारांना वाढीव किमान वेतनाबरोबरच सोयी सुविधांचाही लाभ देणे बंधनकारक ठरणार असल्याचे ते म्हणाले. या अध्यादेशामुळे कंत्राटी कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कंत्राटी कामगारांना गेली अनेक वर्षे कमी पगार आणि अपुऱ्या सोयी सुविधा देऊन राबवण्यात येत असल्याच्या तक्रारी होत होत्या. मात्र फडणविस सरकारने या कामगारांच्या किमान वेतनाचा निर्णय ६ मार्च २०२५ रोजी घेत नुकताच एक अध्यादेश जारी केला असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली.

यापूर्वी कंत्राटी कुशल कामगारांना २१,०७० रुपये वेतन देण्यात येत होते. या निर्णयानुसार त्यांना यापुढे ३०,५२० रुपये किमान वेतन मिळणार आहे. अर्धकुशल कामगारांना यापूर्वी २०,०७० रुपये वेतन मिळत होते, आता त्यांना २८ हजारावर वेतन मिळणार आहे. तर अकुशल कामगारांना मिळणारे १८,५७० रुपये वेतन आता २५,०७० रुपये मिळणार असल्याची माहिती केळकर यांनी दिली.

ठाणे महापालिकेत शेकडो कंत्राटी कामगार ठेकेदारांकडे काम करीत आहेत. मात्र त्यांना कमी वेतन देऊन त्यांना राबवले जाते. शिवाय त्यांना सोयी सुविधाही अपुऱ्या दिल्या जात आहेत. याबाबत महापालिका प्रशासनासह अधिवेशनातूनही मी कंत्राटी कामगारांच्या समस्यांना वाचा फोडली आहे. फडणविस सरकारने कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनाचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद असून यामुळे ठेकेदारांकडून होणाऱ्या पिळवणुकीला आळा बसणार असल्याचे केळकर म्हणाले.

## दुकानांसह ट्रान्सफॉर्मरवर पडली झाडाची फांदी

ठाणे: कोपरी मार्केट या ठिकाणी असलेल्या ०३ दुकानासह त्या लागत असलेल्या महावितरणच्या ट्रान्सफॉर्मरवरती सुकलेल्या झाडाची फांदी पडली. हा प्रकार शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास समोर आला. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी, त्या दुकानांचे किरकोळ नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन, महावितरण या विभागांनी धाव घेतली. तसेच दुकान गाळ्यांवरती व महावितरणच्या ट्रान्सफॉर्मर वरती पडलेली झाडाची फांदी हायड्रा मशीनच्या सहाय्याने काढून कापून बाजूला करण्यात आली आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## आपत्ती व्यवस्थापन आणि बचावाचे धडे प्रत्येक नागरिकासाठी आवश्यक -कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा,आयटीआय मध्ये नव्या सहा अभ्यासक्रमांची केली घोषणा

**ठाणे:** जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम इथे दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवर सध्या तणावाचे वातावरण आहे. पार्श्वभूमीवर कौशल्य विभाग आणि अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षणाधिकारी अनिल सदाफुले, ठाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य स्मिता माने, शासकीय तांत्रिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.टिकोले, राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा पुढे म्हणाले की, राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाईन द्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत. आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाने घेतले पाहिजे. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे श्री. लोढा म्हणाले.

त्याचबरोबर या कार्यक्रमात मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आयटी आयमध्ये सहा नव्या अभ्यासक्रमाची यावेळी घोषणा केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात, ई व्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा यात समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.दोन दिवसीय शिबिरात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुनील मंत्री यांचे विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन लाभले. तर राज्याचे माजी पोलीस महासंचालक श्री. प्रवीण दीक्षित यांनी राज्यातील आयटीआय विद्यार्थ्यांची नागरी संरक्षण या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा घेतली.

राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतल्या शिबिराच्या सुरुवातीला डॉ. लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापन संकल्पना नेमकी काय हे विद्यार्थ्यांना सांगितले. या दोन दिवसीय शिबिरात बचाव आणि मदतकार्य याचे प्रशिक्षण ही देण्यात येणार आहे. मानव निर्मित आपत्ती यात युद्धाचा समावेश असून त्या काळात घ्यायची काळजी, उपचार आणि बचाव यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत बचावाची प्रात्यक्षिके विद्यार्थिनींनी सादर केली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य एस. एस. माने यांनी यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# पावसाळा कालावधीत सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे :-** आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील विविध प्राधिकरणांमार्फत सुरू असलेली विकासकामे येत्या २० मे पर्यंत पूर्ण करण्याचे तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे, असे सक्त निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृहात मान्सून पूर्व आढावा बैठक पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी या बैठकीस उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीस निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे मान्सूनपूर्व उपाययोजनांच्या तयारीची माहिती दिली. श्री.शिनगारे म्हणाले की, घोडबंदर रोडवरील कामांवर विशेष लक्ष ठेवण्याचे आणि सर्व कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित प्राधिकरणांशी समन्वय साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. पावसाळ्यात कोणतीही आपत्ती आल्यास एकमेकांकडे अंगुलीनिर्देश न करता सतर्क राहून काम करण्याचेही त्यांनी बजावले आहे. यावेळी जिल्हाधिकारी शिनगारे यांनी सर्व यंत्रणांना वर राहण्याचे आणि भरतीच्या वेळी विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले. जास्त उंचीच्या लाटा येण्याची शक्यता असलेल्या दिवशी आवश्यक उपाययोजनांसह सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच सर्व विभागांचे आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४७ कार्यरत ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. एमएमआरडीएला मान्सूनपूर्वी सर्व रस्त्यांची आवश्यक देखभाल व दुरुस्ती करण्याचे, रस्त्यांवरील खड्डे टाळण्याचे आणि पूर्ण झालेल्या कामांवरील बॅरिकेड्स हटवण्याचे आदेश देण्यात आले. महापालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रस्ते व पुलांची दुरुस्ती करावी, अतिवृष्टीमुळे पडलेल्या खड्ड्यांसाठी आधुनिक यंत्रणा व सामग्री सज्ज ठेवावी, कळवा ते माजिवडा रस्ता मे अखेरपर्यंत पूर्ण करावा आणि खारीगांव टोलनाक्यावरील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले. रेल्वे हद्दीतील अंतर्गत नाले व कल्व्हर्टची साफसफाई करण्याचे आणि ते नियमित स्वच्छ ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला देण्यात आले. यासाठी महापालिका आणि रेल्वेच्या अभियंत्यांनी एकत्रित पाहणी करून आवश्यक कामे तातडीने पूर्ण करावीत, असेही सूचित करण्यात आले. पावसाळ्यात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभागाने योग्य नियोजन केले असून आणि समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. शहरातील बेवारस वाहने उचलण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने विशेष मोहीम राबवून लिलाव प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले. नालेसफाई करताना एमएसईबीच्या केबल्समुळे येणाऱ्या अडचणींवर संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील धोकादायक झाडे व फांद्या छाटणीचे काम ३० मे पर्यंत पूर्ण करून हरित कचऱ्याची त्वरित विल्हेवाट लावावी आणि सर्व यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी शिनगारे यांनी दिले. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नियमित भेटी देऊन कामांवर लक्ष ठेवावे, नालेसफाईनंतरचा गाळ त्वरित उचलावा, तसेच रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःस्सारण आणि उद्यान विभागातील दुरुस्तीची कामे जलद गतीने पूर्ण करावीत, असेही त्यांनी सांगितले. तसेच धोकादायक इमारती सील कराव्यात आणि त्यांची यादी सार्वजनिक करावी, तसेच दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांवरील झोपड्या हटवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले.

## मान्सूनपूर्व तयारीला वेग!



# अखंडित आणि पुरेशा वीज पुरवठ्याचा मार्ग मोकळा...

## सब स्टेशन आणि चार्जिंग स्टेशनला जागा देण्याबाबत निर्णय

**ठाणे :** - ठाणेकरांना अखंडित आणि पुरेसा वीजपुरवठा व्हावा यासाठी आमदार संजय केळकर पाठपुरावा करत असून शहरातील आवश्यक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर आणि सब स्टेशनसाठी महापालिकेकडून दोन आठवड्यात जागा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आमदार संजय केळकर यांनी ठाणे शहरात नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत महापालिका अधिकाऱ्यांची मुख्यालयात बैठक घेऊन चर्चा केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, खाते प्रमुख आणि विभागप्रमुख उपस्थित होते. शहरात काही ठिकाणी नागरिकांना नाहक अपुऱ्या वीज पुरवठ्याचा फटका बसत आहे. ट्रान्सफॉर्मर आणि सब स्टेशनअभावी ही समस्या भेडसावत असल्याने केळकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून या कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेतला. सध्या ट्रान्सफॉर्मर आणि इतर यंत्रणा महावितरणला उपलब्ध झाली असली तरी जागे अभावी ती पडून असल्याची माहिती केळकर यांनी दिली. बुधवारी त्यांनी ठामपा मुख्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेत जागा तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार गावदेवी, हरीनिवास आणि मनोरमानगर भागात दोन ठिकाणी येत्या १५ दिवसांत महापालिका महावितरणला जागा उपलब्ध करून देणार असल्याची माहिती केळकर यांनी दिली. या बरोबरच सध्या इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत असली तरी चार्जिंग स्टेशनअभावी या वाहनांच्या खरेदीकडे वाहनचालक पाठ दाखवत आहेत, त्यामुळे केंद्रीय धोरणाला खीळ बसत आहे. या चार्जिंग स्टेशनला देखील जागा देण्याबाबत श्री.केळकर यांनी आग्रह धरला. त्यानुसार शहरात ३० जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. या बैठकीत दक्ष नागरिकांनी अनधिकृत बांधकामांबाबत केलेल्या तक्रारी आमदार केळकर यांनी अधिकाऱ्यांकडे छायाचित्रांसह सुपूर्द केल्या. भविष्यात अनधिकृत बांधकामांचा प्रश्न ठाणेकरांसाठी त्रासदायक ठरणार असून संबंधित अधिकारी नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत असल्याचे केळकर यांनी निदर्शनास आणून दिले. महापालिकेला उच्च न्यायालयाने गेल्या काही दिवसांत अनधिकृत बांधकामांवरून दोनवेळा दंड सुनावला आहे. यावरून अधिकाऱ्यांना कारवाई करण्याची इच्छाच राहिली नसून न्यायालयाच्या शिक्षेची वाट पाहत असल्याची टीका केळकर यांनी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारीनुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांनी दिल्याची माहिती केळकर यांनी दिली. बैठकीत आमदार संजय केळकर यांच्यासोबत माजी नगरसेवक सुनेश जोशी, संतोष साळवी, परिवहन समिती सदस्य विकास पाटील आदी उपस्थित होते. ढोकाळी-कोलशेत मार्ग फेरीवालामुक्त ठेवणाररस्ता रुंदीकरणासाठी नागरिकांनी महापालिकेला त्यांच्या जागा दिल्या असताना त्याच जागेवर फेरीवाल्यांचे अतिक्रमण कसे होऊ शकते, असा संताप केळकर यांनी बैठकीत व्यक्त केला. रखडलेल्या ढोकाळी-कोलशेत मार्गाचे काम माझ्या पाठपुराव्यामुळे पुन्हा सुरू झाले असले तरी या मार्गावर फेरीवाल्यांनी बस्तान बसवू नये यासाठी हा रस्ता फेरीवालामुक्त ठेवावा, अशी मागणी केळकर यांनी केली. याबाबत लवकरच नोटिफिकेशन काढण्यात येणार असल्याची त्यांनी दिली.



नालेसफाई, अनधिकृत बांधकामे आदी समस्यांवर आमदार संजय केळकर यांची अधिकाऱ्यांशी चर्चा

# पावसाळा कालावधीत विविध प्राधिकरणांच्या सर्व यंत्रणांनी सतर्क रहावे : आयुक्त सौरभ राव

ठाणे : मान्सूनच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात विविध प्राधिकरणामार्फत तसेच ठाणे महापालिकेच्यावतीने सुरू असलेली सर्व विकासकामे ही येत्या २० मे पर्यंत पूर्ण करावीत. घोडबंदर रोडवर सुरू असलेल्या कामांवर महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवून सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण होतील या दृष्टीने संबंधित प्राधिकरणांशी समन्वय साधावा. पावसाळ्यात कोणतीही आपत्ती उद्भवल्यास एकमेकांवर केलेले आरोप खपवून घेतले जाणार नाहीत, तसेच पावसाळा कालावधीत सर्व यंत्रणांनी सतर्क रहावेअशा सूचना महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत सर्व प्राधिकरणांना दिल्या आहेत.

मान्सूनपूर्व कामांचा आढावा तसेच मान्सून कालावधीत करावयाच्या उपाययोजना याचा आढावा घेण्यासाठी आज महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज बैठक आयोजित केली होती. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, यांच्यासह महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीएचे अधिकारी, मेट्रो, महावितरण, महानगर गॅस, रेल्वे आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मान्सून कालावधीत सर्व यंत्रणांनी अलर्ट मोडवर रहावे. भरतीच्या वेळांवर लक्ष ठेवून ज्या दिवशी जास्त उंचीच्या लाटा असतील त्या दिवशी आवश्यक त्या उपाययोजनांसह यंत्रणांनी सज्ज रहावे. तसेच सर्व विभागांचेआपत्ती व्यवस्थान कक्ष २४*७ कार्यान्वित ठेवण्याच्या सूचनाही आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या.

एमएमआरडीएने मान्सूनपूर्वी सर्व रस्त्यांची आवश्यक देखभाल व दुरूस्ती करुन घ्यावी, रस्त्यावर खड्डे पडून अपघात होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच ज्या ठिकाणची रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत तेथील बॅरिगेटस काढून घ्यावेत. तसेच तत्वज्ञान विद्यापीठ येथे सुरू असलेल्या रस्त्याची कामे २० मे पूर्वी पूर्ण करावीत. मेट्रोच्या कामासाठी उभारण्यात आलेले लोखंडी बॅरीगेटस जमिनीपासून वर उचलावेत तसेच ज्या ठिकाणची कामे पूर्ण झाली आहेत, त्या ठिकाणी पडलेले अनावश्यक साहित्य उचलण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या.

महापालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मान्सूनपूर्वी रस्ते व पुलाची देखभाल दुरुस्ती करुन घ्यावी, अतिवृष्टीने खड्डे पडल्यास अत्याधुनिक यंत्रणा वापरुन ते तात्काळ दुरुस्त होतील या दृष्टीने आवश्यक ती साधनसामुग्री सज्ज ठेवावी. कळवा ते माजिवडापर्यंतचा रस्ता मे अखेरपर्यत पूर्ण करावा. खारीगांव टोलनाका येथील रस्त्यावर मास्टीकचे काम निविदा काढून पूर्ण करुन घेण्याचे निर्देशही या बैठकीत देण्यात आले.

रेल्वेच्या हद्दीत असलेले अंतर्गत नाले कलव्हर्टची साफसफाई करुन घ्यावी. तसेच रेल्वेचे कलव्हर्ट नियमित स्वच्छ होतील या दृष्टीने कायमस्वरुपी उपाययोजना कराव्यात. रेल्वेच्या हद्दीत करावयाच्या कामांबाबत महापालिका व रेल्वेच्या अभियंत्यांनी एकत्रित पाहणी करुन आवश्यक ती सर्व कामे तातडीने पूर्ण करुन घ्यावीत. पावसाळ्यात वाहतूक कोंडी होणार नाही या दृष्टीने वाहतूक विभागाने नियोजन करावेत, यासाठी समन्वय अधिकारी नेमावेत. ज्युपिटर रुग्णालय येथे सुरु असलेली रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत असे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी नमूद केले. तसेच रोड नं. २२ रस्ता येथे कलव्हर्टचे काम अपूर्ण असून या कामासाठी अतिरिक्त मनुष्यबळ पुरवून सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी नगरअभियंत्यांना दिल्या. हे काम ५ जूनपूर्वी पुर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. चिरागनगर कॅडबरी जंक्शन येथे सुरु असलेली कामे देखील युध्दपातळीवर पूर्ण करावीत.

ठाणे शहरात विविध ठिकाणी बेवारस असलेली वाहने उचलण्याची कार्यवाही प्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने करण्यात यावी यासाठी कॅम्प लावून लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी यावेळी दिल्या. महापालिका क्षेत्रात नालेसफाईची कामे सुरु असून या ठिकाणी एमएसईबीच्या केबल्स गेल्यामुळे नालेसफाई करताना अनेक अडचणी येत असून यासाठी ज्या विभागाच्या केबल्स आहे त्यांनी यावर तातडीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

महापालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक झाडे व झाडांच्या फांद्या छाटणीचे काम सुरु असून सदरचे काम ३० मे पर्यत पूर्ण करुन यापासून निर्माण होणारा हरित कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावण्याच्या सूचना देत मान्सून कालावधील सर्व यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवण्याचे निर्देशही आयुक्त सौरभ राव यांनी दिले.

# कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनच्या माध्यमातून ६८९ जणांची कर्करोग तपासणी

**ठाणे :** असंसर्गजन्य व्याधीमध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेवून ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात २ ते ६ मे या कालावधीत कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनमार्फत झोपडपट्टी विभागात राहणाऱ्या नागरिकांची मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग तपासणी करण्यात आली. यात ३० वर्षावरील महिला व पुरूषांची तपासणी करण्यात आली असून ३२० जणांनी मुख कर्करोग तपासणी, १८६ जणांनी स्तन कर्ककरोग तपासणी, १८३ जणांनी गर्भाशय मुख कर्करोग तपासणी करुन घेतली. एकूण ६८९ नागरिकांनी या तपासणीचा लाभ घेतला.

४ फेब्रुवारी या जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कॅन्सर डायग्नॉस्टिक व्हॅनचे उ?द्घाटन मुंबईत केले होते. ही व्हॅन संपूर्ण महाराष्ट्रभर फिरणार असून २ मे ते ६ मे या कालावधीत ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात या व्हॅनमार्फत तपासणीचा दौरा आयोजित करण्यात आला होता. २ मे रोजी रोझा गार्डनिया, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात या व्हॅनचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या हस्ते, उपआयुक्त (आरोग्य), ठाणे महानगरपालिका श्री. उमेश बिरारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितिल के. व माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. वर्षा हेमंत ससाणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. ही व्हॅन कर्करोगाची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांनी सुसज्ज असून यामध्ये मुख

## झोपडपट्टी विभागातील नागरिकांनी केली तपासणी

कर्करोगाच्या तपासणीसाठी डेंटल चेअर व बायप्सी घेण्यासाठीची आवश्यक उपकरणे तसेच गर्भाशय मुख कर्करोगाच्या तपासणीसाठो तपासणी तसेच स्तन कर्करोग बायोप्सी साठी आवश्यक असलेले उपकरणे उपलब्ध आहेत. झोपडपट्टी सदृश्श भागात राहणारे नागरिक जे त्यांच्या उच्च तपासणीसाठी रुग्णालयांपर्यंत पोहोचू शकत नाही अशा लोकांना या सुसज्ज व्हॅन द्वारे सेवा देण्यात यावी हा या कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनचा मुख्य उद्देश आहे. ही व्हॅन प्रथम नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र रोझा गाडेनिया, सी आर वाडीया, किसन नगर असा दौरा करत अखेरीस लोकमान्य कोरस या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात आली.

या व्हॅनमार्फत तपासणी करण्यात आलेल्या महिलांपैकी १३१ महिलांची Pap smear तपासणी व ३९ महिलांची VIA तपासणी करण्यात आली. तसेच ०७ पुरूष व ०१ महिलेची मुख कर्करोगाच्या निदानाकरीता ग्दजे करण्यात आली. सदर तपासणीत ०३ पुरुष व १० महिला या संशयीत रूग्णांना नजिकच्या रूग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले असून त्यांना देण्यात येणाऱ्या उपचारांचा पाठपुरावा संबंधित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत करण्यात येईल असे माता बालसंगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे यांनी सांगितले.

# १२ वी निकाल : ठाणे जिल्ह्याचा कोकण विभागात दुसरा क्रमांक !

ठाणे : फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून, ठाणे जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन करत कोकण विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्याचा एकूण निकाल ९३.७४इ इतका लागला असून, एकूण ९६,०८९ विद्यार्थ्यांपैकी ८९,८२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात मुलींचा निकाल ९२.९१इ तर मुले ८९.५५इ उत्तीर्ण झाले असून, मुलींची सरासरी कामगिरी मुलांपेक्षा जास्त आहे. तसेच जिल्ह्यात ८७५० विदयार्थी यांनी फेरपरीक्षा दिली असून त्या पैकी ५४२१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले, निकाल विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य यांचा संगम आहे. परीक्षेत पारदर्शकता राखण्यासाठी घेतलेल्या उपाययोजनांचे हे यश आहे.

# प्रत्येकाच्या कामासाठी आपण प्रयत्न करणे हे महत्वाचे आहे - आ. केळकर...



सोडविण्यासाठी दर सोमवारी व शुक्रवारी ठाण्याच्या भाजपाच्या खोपट कार्यालयात साकाळी १०.३० ते १ पर्यंत उपस्थित असतात. या उपक्रमाला नागरिकांचा उदंड असा प्रतिसाद मिळत आहे. विविध तक्रारी या उपक्रमात नागरिक आ. केळकर यांच्याकडे घेऊन येत असतात.

यावेळी विविध तक्रारीची ४८ निवेदने आ. केळकर यांच्याकडे प्राप्त झाली. विकासकाने घरांबाबत केलेली फसवणूक, कंत्राटी कामगार, सी सी टी व्ही विषय, बाधित होणारी दुकाने पुनर्वसन, पाणी विषय, विविध पोलीस स्टेशन अंतर्गत विषय, अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, बदली विषय, ठा म पा कर्मचारी विषय, शालेय ॲडमिशन विषय, सफाई कामगार विषय अशा विविध विषयांतील निवेदने आ. केळकर यांना देण्यात आली.

यावेळी खोपट कार्यालयात ठाणे परिवहन सदस्य विकास पाटील, माजी नगसेवक भरत चव्हाण, दीपक जाधव, ओमकार चव्हाण, उपस्थित होते.

आजच्या जनसंवाद उपक्रमात फसवणूकी पासून सामूहिक विविध विषयांच्या तक्रारी माझ्याकडे प्राप्त झाल्या. त्या तक्रारीचे निरसन करणे, त्या पाठपुरावा करण्याकरिता यंत्रणा आहे. येणय्रा प्रत्येकाचे काम होतंच असे नाही, पण आपण प्रयत्न केले पाहीजे, त्यांचे समाधान झाले पाहीजे असे आ. केळकर यांनी बोलताना सांगितले.

## क्रेडाई एमसीएचआयच्या व्यवस्थापकीय समिती मध्ये झोपडपट्टी विकास समिती अध्यक्षपदी भूषण भानुशाली यांची नियुक्ती

ठाणे : एमसीएचआय क्रेडाईच्या नवीन व्यवस्थापकीय समितीमध्ये ठाण्यातील भूषण भानुशाली यांची व्यवस्थापकीय समिती सदस्य आणि झोपडपट्टी विकास समिती च्या अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ठाण्याच्या रियल इस्टेट व्यवसायात सकारात्मक काम करणय्रांमध्ये भूषण भानुशाली यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग आणि काम करण्याचे कौशल्य याचा निश्चितच फायदा रिअल इस्टेट व्यवसायाला होईल असा विश्वास एमसीएचआय क्रेडाईने व्यक्त केला आहे.

सामूहिक कौशल्य, आवड आणि समर्पण हेच रिअल इस्टेट व्यवसायात महत्वाचे असून हे सर्व गुण भूषण भानुशाली यांच्यात असून त्यांनी ठाण्याच्या रिअल इस्टेट क्षेत्रात वाढ, नाविन्य आणि प्रगती करावी अशा शुभेच्छा त्यांना एमसीएचआय क्रेडाईने दिल्या आहेत. तसेच झोपडपट्टी विकास समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. भानुशाली यांचा अनुभव महत्वाच्या उपक्रमांना चालना देण्यासाठी, विविध आव्हानांना तोंड देण्यासाठी तसेच समाजासाठी संधी निर्माण करण्यासाठी मोलाचा ठरेल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. क्रेडाई एमसीएचआयच्या सदस्यांना आणि रिअल इस्टेट उद्योगाच्या हिताचा प्रचार करणे, सहकार्य आणि ज्ञानाचे आदान प्रदान करण्याची भावना वाढविणे, नियामक आव्हानांचा सामना करणे आणि धोरण सुधारणा करण्यासाठी कायदेशीर प्रयत्न करणे. क्रेडाई एमसीएचआयच्या माध्यमातून प्रतिष्ठा आणि विश्वासार्हतेत वाढ करण्यासाठी भूषण भानुशाली निश्चितच यशस्वी ठरतील असेही त्यांनी नमूद केले.

भूषण भानुशाली यांना व्यवस्थापकीय समिती सदस्य आणि झोपडपट्टी विकास समितीचे अध्यक्ष या पदावर काम करण्यासाठी क्रेडाई एमसीएचआयने शुभेच्छा दिल्या आहेत.



# ठाण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला खिंडार सात माजी नगरसेवकांचा शिंदे सेनेत प्रवेश



**ठाणे:** कल्याण-डोंबिवली लोकसभा क्षेत्रातील कळवा, खारेगाव, विटावा परिसरातील सात माजी नगरसेवकांसह एका युवानेत्याने गुरुवारी शिवसेनेचे मुख्यनेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये प्रवेश केला. यावेळी शिवसेना खासदार नरेश म्हस्के, शिवसेना सचिव राम रेपाळे उपस्थित होते. नगरसेवकांच्या पक्ष प्रवेशाने पालिका निवडणुकीपूर्वी ठाण्यात शिवसेना आणखी भक्कम झाली आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाला खिंडार पडले असून कळवा मुंब्रा विधानसभेचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासाठी मोठा धक्का आहे.

ठाणे मनपाचे माजी विरोधी पक्षनेत्या प्रमिला मुकुंद केणी, माजी नगरसेवक मिलिंद पाटील, माजी नगरसेविका मनाली पाटील, माजी नगरसेवक महेश साळवी, माजी नगरसेविका मनिषा साळवी, माजी नगरसेविका व ठाणे महिला राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्याध्यक्षा सुरेखा पाटील, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे यांनी आणि युवानेते मंदार केणी यांनी भगवा झेंडा हाती घेऊन शिवसेनेमध्ये प्रवेश केला. ठाणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतून दररोज शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत.

ठाणे जिल्हा हा धर्मवीर आनंद दिघे आणि शिवसेनेचा गड आहे. ठाणे महानगरपालिकेतील ७८ नगरसेवक शिवसेने सोबत आहेत. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शिवसेना कधी काम करत नाही. शिवसेनेचे काम वर्षाचे बारा महिने ३६५ दिवस सुरु असते याचा अनुभव जनतेने घेतलाय. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षातील लोकप्रतिनिधी शिवसेनेत प्रवेश करत आहेत.

**दिवा शहरातील फेरीवाल्यांच्या समस्येमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न पालिका प्रशासनाकडून सुटत नसल्याने मनसेचे प्रशांत गावडे यांनी याबाबत आता पोलीस आयुक्तांना पत्र लिहले आहे.हे पत्र दिव्यातील नागरीकांच्या माहीतीसाठी जसेच्या तसे छापत आहोत..**

**प्रति,**
मा. श्री.आशुतोषजी डुंबरे साहेब
पोलिस आयुक्त - ठाणे
यांसी सस्नेह जय महाराष्ट्र !
सन्माननीय महोदय,

दिवा शहरातील फेरीवाल्यांच्या समस्येमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत जात आहे. दिवा स्टेशन पासून ते दिवा चौक पर्यंत तसेच साबे गाव रस्ता, मुंबादेवी कॉलनी रस्ता आणि दिवा आगासन रस्त्यावर फेरीवाले तीन - तीन रांगा लावून रस्ता अडवून बसत आहेत. यातील बहुतांश फेरीवाले हे दिव्यात वास्तव्यास नसून ते कळवा आणि मुंब्रा या शहरातून दिव्यात येतात. या फेरीवाल्यांमुळे दिवा चौकापासून ते दिवा रेल्वे स्टेशन पर्यंत रोज मोठ्या प्राणावर वाहतूक कोंडी होते. याबाबत महापालिकेकडे अनेक वेळा तक्रार करूनही थातूरमातूर कारवाई सोडल्यास कोणतीही ठोस कारवाई होताना दिसून येत नाही. कारण कारवाई करणारे महापालिका कर्मचारी आणि फेरीवाले यांचं असणारं साटंलोटं हे सर्वांना जगजाहीर आहे. त्यामुळे त्यांच्याकडून काहीही ठोस कारवाई होईल असे वाटत नाही.

या बेशिस्त फेरीवाल्यांमुळे वाहतुकीचा खोळंबा तर होतोच आहे; पण त्याचबरोबर आता नागरिकांच्या जीवावरही हे फेरीवाले उठले आहेत. नागरिकांना चालायला जागाच उपलब्ध होत नसल्याने नाईलाजाने लोकांना रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागते. लहान मुले, वृद्ध, महिला यांना रस्त्यावरून चालल्याने अनेक वेळा मागून येणाऱ्या वाहनांची धडक बसून ते जखमी झालेले आहेत. काल दिवा स्टेशन मार्गावरील चंद्रांगण रेसिडेन्सी समोरील रस्त्यावर घडलेल्या अशाच प्रकारामुळे श्रीमती छाया धोंडिराम पवार, वय वर्षे ६७ यांना रस्त्यावरून चालत असताना मागून येण्ग्र्या वाहनाने त्यांना धडक दिली. ज्यात त्यांच्या उजव्या पायाच्या घोट्याच्या पंजाला गंभीर दुखापत झाली आहे. (सोबत त्याचे सर्व फोटो जोडलेले आहेत) धडक देण्ग्र्या अज्ञात वाहनचालकावर पोलिसांनी गुन्हा नोंद केला असला तरीही, या प्रकरणात रस्त्यावर वाहतुकीस आणि रहदारीस अडथळा करून सदर वृद्ध महिलेला रस्त्यावरून चालण्यास भाग पाडण्ग्र्या फेरीवाल्यांच्या विरोधात देखील गुन्हा नोंद होणे गरजेचे आहे.

म्हणूनच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २८५ च्या नव्या सुधारित कायद्यातील तरतुदींनुसार सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा करण्ग्र्या फेरीवाल्यांवर गुन्हा दाखल करावा. सार्वजनिक आरोग्य , सुरक्षितता, सोयी, सभ्यता आणि नैतिकता प्रभावित करण्ग्र्या गुन्ह्यांबद्दल भारतीय न्याय संहिता प्रकरण १५ अंतर्गत जो कोणी, त्याच्या ताब्यातील अथवा त्याच्या ताब्यातील कोणत्याही मालमत्तेची सुव्यवस्था न स्वीकारता, कोणत्याही सार्वजनिक मार्गावर कोणत्याही व्यक्तीला धोका, अडथळा किंवा दुखापत निर्माण करेल अशा व्यक्तींवर या कायद्यातील नवीन सुधारित तरतुदींनुसार गुन्हा दाखल व्हायला हवा.

याच नवीन कायद्याअंतर्गत सांगली जिल्ह्यातील विटा शहरात वाहतुकीस अडथळा करण्ग्र्या कमलेश लालचंद जाट (वय ३४) या आईस्क्रीम विक्रेत्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे वरील सुधारित कायद्यान्वये दिवा शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे धिंदवडे उडवणाऱ्या फेरीवाल्यांवर कठोर कारवाई केल्यास या फेरीवाल्यांना कायद्याचा धाक बसण्याची शक्यता आहे. तरी याबाबत आपण योग्य ती कार्यवाही करून दिवेकर नागरिकांना या फेरीवाल्यांच्या जाचातून भयमुक्त करावे ही विनंती.

धन्यवाद..

आपला नम्र
**प्रशांत प्रभाकर गावडे**
महाराष्ट्र नवनिर्माण सेना ,सचिव - दिवा शहर
संपर्क - ९८१९१८९२९१

